MHBU160006952023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | | ०४/०७/२०२३ |
| नोंदणी दिनांक | | ०४/०७/२०२३ |
| निकाल दिनांक | | १६/०३/२०२६ |
| कालावधी | | ०२ वर्ष – ०८ महिने – १२ दिवस |

**भाग – अ**

**प्रपत्र क्र.३२**

(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण – ६ परीच्छेद क्र.४४ (I))

| | | |
|---|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं. १, मोताळा, जि. बुलडाणा यांचे न्यायालयात**<br>(प्रभारी पिठासिन अधिकारी : सतिशकुमार श्री. गायकवाड)<br>**न्यायनिर्णय**<br>(घोषीत दिनांक – १६/०३/२०२६) | | |
| | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८१/२०२३ | निशाणी – ११ खाली |
| | प्रथम खबर अहवाल क्र. ३६/२०२३ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मलकापुर, जि. बुलडाणा. |
| **अभियोगपक्ष** | | महाराष्ट्र सरकार तर्फे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मलकापुर, ता. मलकापुर, जि. बुलडाणा. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता स.भी.चव्हाण. |
| **आरोपी** | | गिता विलास गायकवाड,<br>वय : ३७ वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. बोराखेडी, ता. मोताळा, जि. बुलडाणा. |
| आरोपीतर्फे | | विधिज्ञ एम. के. शर्मा. |

**भाग – ब**

(फौजदारी नियमावलीचे परीच्छेद क्र.४४ (ii))

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १९/०५/२०२३ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १९/०५/२०२३ |
| ३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०४/०७/२०२३ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | ०४/०७/२०२३ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०९/२०२३ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | निरंक |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| ८ | दोषसिध्दी आदेशाचा दिनांक असेल तर | निरंक |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गिता विलास गायकवाड | समजपत्र दिले | ०४/०७/ २०२३ | ६५ (ई) व (ड) म.दा.क. | निर्दोष | निरंक | निरंक |

प्रस्तुतचा खटला वर नमुद आरोपी हिचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) व (ड) नुसार चालला.

## मुददे व निष्कर्ष

२) दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुददे विचाराधीन येतात. सदर मुदयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपी ही विनापरवाना व बेकायदेशीररित्या ०९ लि. गा. हा. भ. दारुची चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने व २१९ लि. मोहा रसायन दारु निर्मीती करण्याच्या उददेशाने साहित्यासह बाळगतांना मिळुन आली ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | : | नाही. |
| २. | अंतीम आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतुने फक्त एक साक्षीदार तपासला आहे. सा.क्र. १ पंच रमेश पांडुरंग चहाकर याला तपासले आहे. अभियोगपक्षाने महत्वाचे साक्षीदार तपासल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी ०१ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला आहे.

४) आरोपीविरुध्द गुन्हयाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी ०१ वर पारित करण्यात आला आहे.

## मुददा क्रमांक ०१ करीता

५) सा.क्र. १ रमेश याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. परंतु, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी त्याला पंच म्हणुन कोठेही बोलावले नव्हते. त्याने घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली आहे. मात्र, त्यातील मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे. अभियोगपक्षाने त्याला फितुर घोषीत करुन त्याचा उलटतपास नोंदविला. परंतु, अभियोगपक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही.

६) अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीचे बारकाईने अवलोकन करण्यात आले. जप्ती पंच हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असतो. त्यामुळे त्याने अभियोगपक्षास अनुकुल कथन करणे आवश्यक असते. परंतु, सा.क्र. १ रमेश याने अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथानकाविषयी माझे मनात संशय उत्पन्न होतो.

७) वर चर्चीलेल्या विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, सदर प्रकरणात जप्ती पंच सा.क्र. १ रमेश हा अभियोगपक्षास अनुकुल असे काहीही कथन करीत नाही. त्यामुळे मी अशा निष्कर्षास येतो की, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द लावण्यात आलेला दोषारोप निःसंशयपणे सिध्द केला नाही. सबब, दिनांक १९/०५/२०२३ रोजी ०७.३० ते ०८.३० वाजताचे दरम्यान, विश्वगंगा नदीचे काठी, बोराखेडी शिवार, ता.मोताळा येथे आरोपी ही विनापरवाना व बेकायदेशीररित्या एकुण ०९ लिटर गावठी हातभटटी दारु चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने व एकुण २१९ लिटर मोहा रसायन गावठी हातभटटी दारु निर्मीती करण्याच्या उददेशाने साहित्यासह एकुण रक्कम रु. ६,२१०/– मिळुन आली ही बाब अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केली नाही. यास्तव, मी मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ०२ करीता

८) वर नमुद केल्याप्रमाणे आरोपी ही सबळ पुराव्याअभावी प्रस्तुत प्रकरणातुन निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. संपुर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी जप्त दारु, मोहा रसायन व साहित्य हे जागीच नष्ट केले होते. सबब, त्या संबंधाने काहीच आदेश पारीत करण्यात येत नाही. यास्तव, मी मुद्दा क्र. ०२ चे संबंधाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी नामे गिता विलास गायकवाड हिची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) व (ड) च्या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१)/ भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ/ भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता आरोपीचे वैयक्तिक व जामिनदाराचे बंधपत्र ०६ महिने कालावधीपर्यंत कायम करण्यात येतात त्यानंतर ते रदद समजण्यात यावे.

३) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD

Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.16 17:03:24 +0530

दिनांक :- १६/०३/२०२६

स्थळ :- मोताळा.

(सतिशकुमार श्रीपतराव गायकवाड)

प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं. १,

मोताळा, जिल्हा बुलडाणा.

**भाग – क**

(फौजदारी नियमावलीचे परीच्छेद क्र.४४ (iii))

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | रमेश पांडुरंग चहाकर | ११ खाली | पंच |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असतील तर :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी दिलेल्या कागदपत्रांची यादी

अ. अभियोग पक्ष :-

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ब. बचाव पक्ष :–

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयाने कागदपत्रांना दिलेल्या निशाणी :–

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. भौतिक वस्तु :–

| अनु क्रं. | भौतिक वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

दिनांक :– १६/०३/२०२६

स्थळ :– मोताळा.

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD

Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.16 17:03:12 +0530

(सतिशकुमार श्रीपतराव गायकवाड)

प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं. १,

मोताळा, जिल्हा बुलडाणा.